**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१३१/२०२३

दिनांक-२४.०२.२०२५

**प्रति,**

१. कै. प्रकाश बाजी होवाळे (म.वा)

१अ. संगिता प्रकाश होवाळे

१ब. सुरज प्रकाश होवाळे

१क. अक्षय प्रकाश होवाळे

२. बायाक्का ऊर्फ बायडा महिंद्र काबळे

३. बेबी ऊर्फ जयश्री मच्छिंद्र कांबळे

४. कमल गिरमल कांबळे

नं १अ. ते १क. रा.भिमनगर, मंगळवेढा ता.मंगळवेढा जि.सोलापूर

नं २ ते ३ रा.सोन्याळ, ता.जत, जि.सांगली

नं ४ रा.बोलवाड, ता.मिरज, जि.सांगली **.....अपिलार्थी**

**विरुध्द**

१. कै.रावसो बाजी होवाळे(म.वा)

१/१. शालन रावसाहेब होवाळे

१/२. बाबु रावसाहेब होवाळे

दवारा अक्षय प्रकाश होवाळे

१/३. झुंबर दिलीप खवतोडे

१/४. रेखा श्रीनिवास करपस्वामी

२. कै.तुकाराम बाजी होवाळे (म.वा)

२./१ शोभा तुकाराम होवाळे

२/२. सतिश तुकाराम होवाळे

२/३. रमेश तुकाराम होवाळे

२/४. रेणुका प्रकाश वाघमारे

३. कै.नाजुकाबाई वशिष्ठ मिश्रा(म.वा)

३/१ शिला दत्तात्रय रोहिते

३/२ सचिन वशिष्ठ मिश्रा

नं.१/१ ते १/४ रा.रड्डे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

नं.२/१ ते २/३ व ३/ब रा.भिमनगर, मंगळवेढा, ता.मंगळवेढा

नं.२/४ रा.सिध्दार्थनगर, पंढरपूर, ता.पंढरपूर

नं.३/अ. रा.समर्थ अपार्टमेंट, प्लॅट नंबर २, कुरेशी बिल्डींगच्या समोर, दत्त चौक, सोलापूर ४१३००२ --------- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे व्हसपेठ, ता.जत, जि. सांगली येथील गट नंबर ११,३३१,७८० या मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, माडग्याळ यांनी फेरफार नंबर २४९५,४८५२ व ४८५३ प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपिल मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

**१.** मौजे व्हसपेठ, ता.जत, जि. सांगली येथील गट नंबर ११,३३१,७८० या मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, माडग्याळ यांनी फेरफार नंबर २४९५,४८५२ व ४८५३ प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

**२.** अपिलार्थी हे त्यांचे अपील अर्जामध्ये कै.बाजी तुकाराम होवाळ यांचे वारस असलेचे कथन करीत आहेत. तथापि त्याअनुषंगाने कोणतेही कागदोपत्री पुरावे सादर करीत नाहीत. अपिलार्थी यांनी वंशावळ सादर केलेली असून सदर वंशावळ भारतीय पुरावा कायदयातील तरतूदीनुसार कागदोपत्री पुराव्यासह सदर वंशावळ सिध्द केलेली नाही. अपिलार्थी हे वारस असतील तर त्यांनी सक्षम दिवाणी न्यायालयात दाद मागून घेवून त्यांनी त्यांचा वारसा सिध्द करून घेणे आवश्यक आहे. हिंदू वारसा कायद्यानुसार एखादा व्यक्ती मयत झाला असल्यास कलम ८ प्रमाणे स्थानिक चौकशी व उपरोक्त कागदपत्रे यांचे आधारे विहीत प्रक्रियेअंती उचीत कार्यवाही करून निर्णय घेणे एवढेच मर्यादीत अधिकार क्षेत्र महसूल अधिकारी यांना असून मंडळ अधिकारी, माडग्याळ यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडलेचे दिसून येत आहे.

**३.** विलंबाबाबत म्हणावे तर फेरफार क्र.२४९५ चा विचार करता ११ वर्षे इतका विलंब माफ करावे असे कोणतेही कारण विलंब माफ अर्जात नाही. मुळात अपिलार्थी यांची अपिल अर्जातील मागणी ही दिवाणी स्वरूपाची आहे. त्यासाठी त्यांनी दिवाणी न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. तसेच कोणतेही संयुक्तिक कारण नसतांना केलेला विंलब अर्ज कायदयाचे कसोटीवर टिकू शकत नाही. सबब मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील विलंब माफ अर्जाचे मुद्दयावर फेटाळणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.